बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक १४९ वा । बुधवार दिनांक २० ऑगस्ट, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

धाराशिव (प्रतिनिधी)- परंडा पोलीस ठाणे अंतर्गत-आब्दुल रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव,आयुब रा.नरसिंग नगर परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे छोटा हत्ती क्र एमएच ०७ बीएच २१४३ व अॅपे रिक्षा क्र एमएच २५ एके ०६०७ ही वाहने दि.१८.०८.२०२५ रोजी १३.३० ते १३.४५ वा. सु. महाराष्ट्र बॅंकसमोर परंडा येथे व पठाण हॉस्पीटल समोर बार्शी रोड परंडा येथे सार्वजनिक रोडवर रहदारीस धोकादायकरीत्या अडथळा निर्माण होईल असे स्थितीत उभा केलेले परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ अन्वये परंडा पो.ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

कळंब पोलीस ठाण अंतर्गत राहुल रा. इंदीरानगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांनी आपल्या ताब्यातील जीतु क्लासीक चारचाकी वाहन क्र एमएच २५ एएन ३६५४ हे दि.१८.०८.२०२५ रोजी ११.३० वा. सु. छत्रपती शिवाजी महाराज चौक कळंब ते ढोकी रोडवर सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या अडथळा निर्माण होईल असे स्थितीत उभा केलेले कळंब पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ अन्वये कळंब पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे.

### कपाटातील रोख रकमेची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नवनाथ पांडुरंग घोडके, वय ५४ वर्षे, रा. भवानी चौक गणेश नगर बायपासचे जवळ धाराशिव ता. जि. धाराशिव यांचे घराचे मेनगेटचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.१६.०८.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील कपाटातील रोख रक्कम १५,००० चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-नवनाथ घोडके यांनी दि.१८.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### घरासमोर लावलेल्या मोटारसायकलची चोरी

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी स्वप्निल शरणय्या स्वामी, वय २५ वर्षे, रा. लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव यांची अंदाजे १,३०,००० किंमतीची होंडा युनिकॉर्न मोटरसायकल नितीन पाटील यांचे घरासमोरुन भंडारी येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-स्वप्निल स्वामी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## आम्हाला डीजे नको - लहान मुलांनी शिराढोणकर यांना घातली भावनिक साद





धाराशिव (प्रतिनिधी)- दि.१८.०८.२०२५ रोजी पोलिस स्टेशन शिराढोण व पी.एम.श्री. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व के. एन.विद्यालय शिराढोण यांचे संयुक्त विद्यमाने ध्वनी प्रदुषण जन जागृती रॅली आयोजित करण्यात आली. सदर रॅली मध्ये विद्यार्थी यांनी आम्हाला ञा नको, ध्वनी प्रदुषण,हृदयाचा खुन, सजान शिराढोंनकर, आमचे आरोग्य हीरावु नका, ध्वनी प्रदुषण कमी करूया, आपण सर्व एकत्र येवूया, बास कमी ,सास जास्त, तुमचा वक्ष ,सामन्याची डोकेदुखी, कान फटण्या आधी आवाज थांबवा., सण आहे युद्ध नाही,आवाज कमी ठेवा वगेरे अशा जनजागृती पण घोषणा देवून शिरढोण वासियांना ध्वनी प्रदुषण न करण्याचे आवाहन केले.येणारे सणामध्ये वक्ष न लावता सण साजरे करण्याचा संदेश दिला. या मध्ये दोन्ही शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक वृंद, पोलिस स्टेशन चे अधिकारी ,पोलिस अंमलदार सहभागी होऊन रॅली पूर्ण गावातून काढण्यात आली. या रॅली बाबत जनसामान्यांमध्ये चांगली च चर्चा रंगली असून यातुन तरुणांनी व श्री गणेश मंडळांनी बोध घेवून ञा मुक्त सण साजरे करावेत व एक आदर्श घालावा अशी ही भावना व्यक्त केली जात आहे. पोलीस विभागाकडून देखील सर्वांनी ञा मुक्त मिरवणूक काढणे व कायद्याने मर्यादित केलेल्या आवजच्या पातळीचे पालन करावेत. कायद्याचे कुठेही उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन केले आहे.

## टेबल्याच्या ड्राव्हरमधील १८,०५० घेवून फिर्यादिस केली मारहाण

धाराशिव (प्रतिनिधी)- येरमाळा पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी गणेश राजकुमार वंजारे, वय २३ वर्षे, रा. चोराखळी ता. कळंब जि. धाराशिव यांचे चोराखळी येथील दुकानावर दि. २२.०७.२०१८ रोजी सुशील , वैभव , सचिन, रामा , सर्व रा. चोराखळी ता. कळंब जि. धाराशिव यांनी दारु पिवून येवून दारु पिण्यासाठी पैसे दे म्हणून फिर्यादीस ढकलून देवून टेबल्याच्या ड्राव्हरमधील १८,०५० घेवून गेले. फिर्यादीस रस्त्यात आडवून शिवीगाळ करुन मारहाण केली. त्यावर फिर्यादीचे मामा दत्ता खुने व लक्ष्मण खुने व फिर्यादीची आई हे नमुदांस समजावून सांगत असताना नमुद आरोपींनी त्यांनाही शिवीगाळ करुन मारहाण करून घराचे गेटवर व मोटारसायकलवर दगड मारुन नुकसान केले. तुमचा काटा काढतो असे म्हणून धमकी दिली. वगैरे कागदपत्र मा. कोर्ट २ रे सह न्यायदंडाधिकारी न्यायालय प्रथमवर्ग कळंब यांचे कागदपत्र प्राप्त झाले वरुन दि.१८.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.दं वि कलम ३९४, ४२७, ३२३, ५०४, ५०६, ३४ सह २५(१)(ल)भारतीय शस्त्र कायदा अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## आदर्श महाविद्यालय, उमरगा येथे रोजगार मेळावा



मुरूम (सुधीर पंचगल्ले)- दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी आदर्श महाविद्यालय, उमरगा येथे पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला.

हा उपक्रम आदर्श महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, प्लेसमेंट सेल व पुणे येथील जॉब कनेक्ट इव्हेंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.

**-या मेळाव्याचे उद्दिष्ट -**

विद्यार्थ्यांनी पदवी/पदव्युत्तर शिक्षणातून मिळवलेले ज्ञान व्यावहारिक जगतात उपयोगात आणता यावे, रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक कौशल्ये, मूल्ये व गुण विकसित व्हावेत.

या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आदर्श महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. राम सोलंकर हे होते. तर

प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. ऋषिकेश खोत, श्री. जगताप व कंपनीचे संपर्क अधिकारी श्री. गायकवाड हे होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. लक्ष्मण बिराजदार यांनी केले तर आभार डॉ. अंकुश टाकळे यांनी मानले.

प्राचार्य डॉ. राम सोलंकर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देत सांगितले की -ही सुवर्णसंधी साधून प्रत्येक विद्यार्थ्याने आपले भविष्य उज्ज्वल घडवावे. रोजगार मेळाव्याचा लाभ २५० हून अधिक विद्यार्थ्यांनी घेतला असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा उपक्रम मोलाचा ठरला आहे. या यशस्वी उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. विनायकराव पाटील साहेब, सरचिटणीस मा. बसवराजजी पाटील साहेब, चिटणीस मा. रामकृष्णपंत खरोसेकर साहेब यांनी मनःपूर्वक कौतुक केले.

## देशासाठी प्राण अर्पण - सीआरपीएफचे शूर वीर जवान बाळासाहेब राऊत यांना भावपूर्ण श्रद्धांजली



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- तेर( तालुका धाराशिव ) या मातीत जन्माला आलेला सीआरपीएफ चा धाडसी जवान बाळासाहेब राऊत यांनी देशसेवेच्या कर्तव्य बजावत असताना आपले प्राण राष्ट्रासाठी अर्पण केले आसाम येथे १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी ते आपल्या सेवेत तत्पर असताना अचानक हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे दुःखद निधन झाले . स्वातंत्र्य दिनासारख्या पवित्र दिवशी देशासाठी समर्पित असलेल्या हे बलिदान समाजाच्या मनाला चटका लावून गेले आहे बाळासाहेब राऊत हे सीआरपीएफ मध्ये गेल्या अनेक वर्षापासून कार्यरत होते शिस्त धाडस आणि प्रामाणिकपणा हे त्यांच्या सेवा काळातील विशेष गुण ठरले त्यांनी देशाच्या विविध भागात कठीण परिस्थितीत कर्तव्य पार पाडले होते त्यांच्या निधनाने केवळ कुटुंबच नव्हे तर तेरगाव व धाराशिव जिल्हा आणि संपूर्ण राष्ट्राने एक शूर पुत्र गमावला आहे त्यांच्या पाठीमागे पत्नी एक मुलगा आणि एक मुलगी अचानक आलेल्या संकटामुळे कुटुंब अंधार त सापडले असली तरी गावकरी नातेवाईक आणि वर्गमित्र व परिचित सर्वजण या दुःखात त्यांच्यासोबत उभा आहेत गावात राऊत कुटुंबाच्या घरासमोर शोक काळा पसरली असून प्रत्येक डोळ्यातून अश्रू वाहताना दिसत आहेत गावातील नागरिक म्हणतात की बाळासाहेब हे खरे अर्थाने राष्ट्रभक्त होते देशासाठी जगले आणि देशासाठीच प्राण दिले त्याच्या बलिदानामुळे तेर गावचे नाव अभिमानाने घेतले जाईल सीआरपीएफ कडून त्यांना शोकांजली वाहण्यात आली असून प्रशासनाच्या वतीनेही त्यांच्या कुटुंबीयांना पूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे आज तेर गावचं नव्हे तर संपूर्ण जिल्हा त्यांच्या बलिदानाने भारावून गेला आहे देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या या शूरवीर जवानाला आपण सर्वांनीच नतमस्तक होऊन अभिवादन करावे ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या परिवाराला हे दुःख सहन करण्याची ताकद देऊ हीच प्रार्थना

## श्री तुळजाभवानी देवीजींची सिंहासन पूजा ऑगस्ट माहिन्यासाठी ऑनलाईन नोंदणी वेळापत्रक निश्चित



धाराशिव दि.१९ ऑगस्ट (जिमाका) महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री तुळजाभवानी देविजींच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश,कर्नाटक, तेलंगना व इतर राज्यातून भाविक कुलदेवता असल्याने या ठिकाणी कुलाचार व कुलधर्म करण्यासाठी मोठ्या संख्येने भक्तिभावाने येतात.

श्री देविजीची सिंहासन पुजा ही अत्यंत महत्वाची मानली जाते.ही सिंहासन पुजा नोंदणी ऑनलाईन पध्दतीने श्री.तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर https://shrituljabhavani.org उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

माहे १९ ऑगस्ट मधील सिंहासन पुजा ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येईल याची सर्व भाविक भक्त,महंत,पुजारी,सेवेकरी व नागरीकांनी नोंद घ्यावी.भाविकांनी सिंहासन पुजा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अधिकृत संकेतस्थळ https://shrituljabhavanitempletrust.org यावर सिंहासन पुजा नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत होती.

माहे ऑगस्ट-२०२५ या महिन्यात सिंहासन पूजेच्या नोंदणीसाठी वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.भाविकांनी सिंहासन पूजेसाठी http://shrituljabhavanitempletrust.org यावरून सिंहासन पूजा पास बुकिंग या मेन्यूवर क्लीक केल्यानंतर https://shrituljabhavanimataseva. org या लिंकवर प्रवेश करून भाविकांनी आपली सिंहासन पुजेची नोंदणी करावी.

सिंहासन पुजा नोंदणी २० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजतापासून सुरू होणार आहे.ती २५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजतापर्यंत करता येईल. ऑनलाईन ड्रॉ पध्दतीने प्रथम सोडत व भाविकांना पेमेंटसाठी एसएमएस २७ ऑगस्ट २०२५ रोजी ११ वाजतापर्यंत पाठविण्यात येतील.भाविकांनी प्रथम सोडतीचे ऑनलाईन पेमेंट २७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजतापासून ते २८ ऑगस्टपर्यंत सकाळी १० वाजतापर्यंत करावे.

सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास ऑनलाईन ड्रॉ पद्धतीने व्दितीय सोडत व भाविकांना पेमेंटसाठी २८ जुन २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत एसएमएस पाठविण्यात येतील.

भाविकांनी व्दितीय सोडतीचे ऑनलाईन पेमेंट २८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ ते २९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजेपर्यंत करावे. प्रथम व व्दितीय फेरीत सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास ऑनलाईन ड्रॉ पध्दतीने तृतीय सोडत व भाविकांना पेमेंटसाठी २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजतापर्यंत एमएमएस पाठविण्यात येतील.

भाविकांनी तृतीय सोडतीचे ऑनलाईन पेमेंट २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते ३० ऑगस्ट रोजी रोजी सकाळी १० वाजतापर्यंत करावे.

माहे ऑगस्ट-२०२५ या महिन्यातील अंतीम सिंहासन पुजा बुकींग झाल्याची यादी ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रसिध्द करण्यात येईल.सर्दीय नवरात्र महोत्सवात श्री देवीजींची मंचकी निद्रा असलेले दिनांक १५ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर या कालावधीत सिंहासन पूजा बंद राहणार आहे.

भाविकांनी वरीलप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने सिंहासन पुजा नोंदणीचा लाभ घ्यावा.असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर,संस्थान तुळजापूर तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) यांनी केले आहे.

## शिवभोजन योजनेचा जिल्ह्यात लाखो नागरिकांनी घेतला लाभ

धाराशिव, (जिमाका)- जिल्ह्यात शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणावर नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे.शासनाची महत्वाकांक्षी शिवभोजन योजना ही गरीब व गरजूंना मोठा दिलासा देणारी ठरत आहे.या योजनेअंतर्गत जिल्ह्यात एकूण १८ शिवभोजन केंद्रे कार्यरत असून, योजनेच्या प्रारंभापासून ३१ जुलै २०२५ अखेर तब्बल ३३ लक्ष ३१ हजार ६१९ थाळ्यांचे वितरण करण्यात आले आहे.यामुळे दैनंदिन मजुर,गरीब व वंचित घटकांना परवडणाऱ्या दरात अन्नाची सुविधा मिळत आहे. तसेच,जिल्ह्यात उज्वला गॅस योजनेअंतर्गत १ लक्ष ४ हजार ५९१ गॅस कनेक्शन वितरीत करण्यात आले असून ग्रामीण भागातील महिलांना धुरकट चुलींपासून मुक्तता मिळाली आहे. स्वच्छ इंधनामुळे आरोग्याचे रक्षण तर झालेच, पण घरगुती कामांमध्येही सुलभता आली आहे. दरम्यान,राज्यातील आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना शासनाने दिलासा दिला आहे.जानेवारी २०२३ पासून दरमहा १५० रुपये व एप्रिल २०२४ पासून दरमहा १७०रुपये इतके अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे.जिल्ह्यात ३० हजार ८५८ शिधापत्रिकाधारकांना ऑक्टोबर २०२४ अखेरपर्यंत ४७ कोटी ३९ लक्ष ६३ हजार ४५० रुपये इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे. शासनाच्या या कल्याणकारी योजनांचा लाभ थेट गरजूंना मिळत आहे. गरीब,शेतकरी,महिला व वंचित घटकांना दिलासा देण्याचे उद्दिष्ट प्रशासन प्रभावीपणे राबवत असल्याचा विश्वास यामुळे दृढ झाला आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने तुगांव येथील महिलांचा सन्मान



मुरूम (रामलिंग पुराण)-महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल महिला व बालविकास विभाग महाराष्ट्र शासन ग्रामपंचायत स्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी पुरस्कार १५ ऑगस्ट या दिनाचे औचित्य साधून तुगांव ग्रामपंचायत या ठिकाणी सौ.श्रुतिका दत्तात्रय हाजगुडे,सौ. सुजाता नेताजी मोरे, सौ. रुपाली विकास शेंडगे, सौ महानंदा भारत हाजगुडे यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र,शाल, श्रीफळ व पुष्पगुछ देऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य देशभर पसरले आहे, त्यांच्या नावाने मिळालेला पुरस्कार आम्हाला पुढील कार्यासाठी ऊर्जा देणारा ठरेल अशी भावना महिलांनी व्यक्त केली.

याप्रसंगी तुगाव ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, गावातील पदाधिकारी, महिला, शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी व गावातील नागरिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुरूम येथील सिध्दय्याप्पा मंदिरात शिवलिंग प्राण प्रतिष्ठिपणा व अभिषेक

## दुर्लक्षित मंदिराचा पाटील परिवाराकडून जिर्णोध्दार



मुरूम (सुधीर पंचगल्ले) - उमरगा तालुक्यातील स्वातंत्र्यपूर्व काळातील मुरुम येथील सिध्दयाप्पा देवस्थानचा पाटील परीवाराच्या वतीने जिर्णोध्दार करण्यात आला आहे. सुंदर कलाकृतीने साकारलेल्या मंदिरात बुधवारी ष. ब्र. जयमल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते शिवलिंग प्राण प्रतिष्ठापणा व अभिषेक संपन्न होणार आहे. यानिमित्त दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मुरूम शहर हे एक ऐतिहासिक शहर म्हणून सर्वदूर प्रचित आहे. शहरात आजही पुरातन काळातील अनेक मूर्ती आढळून येतात. मुरूम शहरात मयूर राजाचा राज्य होते तेंव्हा मुरूम शहराला मयूरपुरम असेही म्हणत असल्याची इतिहासात नोंद आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून असलेल्या पुरातन काळातील व मागील अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या मुरुम शहरातील श्री सिध्दयाप्पा मंदिराच्या जिर्णोध्दार करण्यात आला आहे.

४५५० स्केअर फूट वसलेल्या दोन मजली मंदिराचे जिर्णोध्दार, सभामंडपाचे काम काशी, श्रीशैल्यम व उजैन पिठाचे विश्वस्त तथा जिल्हा बँकेचे चेअरमन तथा मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष बापुराव पाटील व पाटील परिवाराने स्वनिधीतुन करण्यात आले आहे. मंदिराच्या कामासाठी कर्नाटक राज्यातील बदामी व बनशंकरी येथुन लाल कोरीव दगड व शिल्प मागवण्यात आले आहेत. अप्रतिम कलाकारी असलेल्या देखण्या मंदिरात मंगळवारी (दि.१९) शिवभजन व जागरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. तर बुधवारी (दि.२०) पहाटे ५ वाजता नारळी मठाचे श्री ष. ब्र. जय मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते शिवलिंग प्राण प्रतिष्ठापणा व अभिषेक संपन्न होणार आहे. यावेळी श्री. म. नि. प्र. राजशेखर महास्वामीजी, विरक्तमठ, नंदगाव, मुरुम येथील चरमूर्ती मठाचे श्री. म. नि. प्र. सिद्धमल्ल महास्वामीजी व केसरजवळगा मठाचे श्री. म. नि. प्र. श्री. विरंतेश्वर महास्वामीजी यांचे आर्शीवचन लाभणार आहे. तर सकाळी ११ पासुन ट्रस्टचे अध्यक्ष बापूराव पाटील यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील भाविककांनी लाभ घ्यावा असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष बापूराव पाटील यांनी केले आहे.

## मृत्यू : अखेरचा निष्ठावान सोबती

**********

जीवन हा एक अद्वित्तसंग्राम आहे या प्रवासात कोणी कायमचं नसते मुले आपल्या सोबत जन्मतात पण मोठी होतच आपापल्या वाटेने निघून जातात जीवन साथी असतो पण तोही कधी पुढे कधी मागे राहतो नातेवाईक असतात पण त्याची उपस्थिती परिस्थिती वर अवलंबून असते मात्र या साऱ्या तात्पुरत्या सोबतीमध्ये एक मात्र शाश्वत निष्ठावंत आणि खात्रीशीर सोबती असतो - मृत्यू

आपण त्याला नेहमी अंधार वेदना भीती याची रूपे मानतो पण खरे पाहता मृत्यू हा शत्रू नसून ही जीवनाचा पूर्णविराम आहे जन्म जसा आपल्या हाती नसतो तसंच मृत्यूही आपल्या इच्छावर अवलंबून नसतं पण जन्म व मृत्यू हे दोन्ही मिळून जीवन ही कथा पूर्ण करतात मृत्यूला जर आपण भीतीच्या नजरेने न पाहता आपल्या अखेरचा सोबती मानलं तर प्रत्येक दिवस नव्या उत्साहाने जगता येतो कारण जाणीव ही होते की

✻ वेळ मर्यादित आहे

✻ क्षण अमूल्य आहेत

✻ आणि जीवन हे फक्त जगण्यासाठी नाही तर अनुभवण्यासाठी आहे

मृत्यू म्हणजे अंत नाही तर नव्या प्रवासाचे दार आहेत जसा रात्रीनंतर नवा दिवस उगवतो तसेच मृत्यूनंतरही एखादा अज्ञात पण शांत विश्व उघडते म्हणजे मृत्यूला घाबरण्याऐवजी त्याच्या स्वीकार करूया तोच तर जन्मापासून शेवटी पर्यंत आपल्या सोबत सावलीसारखा चालतो तोच आपल्याला स्मरण करून देतो की - जगा प्रत्येक क्षण प्रेमाने समाधानाने आणि कृतज्ञतेने हाच शेवट हेच सत्य मानले पाहिजे

## शेतकरी कर्जमुक्ती,व्याज सवलत आणि सहकार क्षेत्रात जिल्ह्यात ठोस पावले: ७० सहकारी संस्थांच्या माध्यमातून ऑनलाईन सेवा

धाराशिव (जिमाका)- जिल्ह्यात शेती व सहकार क्षेत्रासाठी विविध महत्त्वाच्या योजना प्रभावीपणे राबविल्या जात असून मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना थेट लाभ मिळत आहे.

महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत अल्पमुदत पिककर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ दिला जात आहे. जिल्ह्यातील ४७ हजार ४२० लाभार्थ्यांच्या याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या असून त्यापैकी ४६ हजार ६१९ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. आतापर्यंत ४४ हजार ७३९ शेतकऱ्यांना १३० कोटी ७७ लाखांचा लाभ वितरीत करण्यात आला आहे.

यासोबतच,जिल्ह्यातील उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सक्षमीकरण व पुनरुज्जीवन करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती गठित करण्यात आली असून सहा बैठका घेण्यात आल्या आहेत.या बैठकीत कर्ज थकबाकी वसुलीसाठी ठोस निर्देश देण्यात आले आहेत.

कृषी बाजार समित्यांमध्ये ई-नाम योजना राबविण्याचे कामही गतीमान झाले आहे.जिल्ह्यातील कळंब आणि मुरूम बाजार समित्यांमध्ये पूर्वीपासूनच ई-नामची अंमलबजावणी सुरू होती.ऑगस्ट २०२३ मध्ये तुळजापूर व उमरगा बाजार समित्यांचा समावेश करण्यात आला.त्यामुळे जिल्हा राष्ट्रीय कृषी बाजाराच्या ऑनलाइन नेटवर्कमध्ये जोडला गेला असून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला अधिक चांगला भाव मिळण्यास मदत होत आहे. उर्वरित बाजार समित्यांचा समावेश करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेत जिल्ह्यातील ११ हजार ५३७ पात्र शेतकऱ्यांना मार्च २०२५ अखेर १ कोटी ३६ लाख रुपयांची सवलत देण्यात आली आहे.मात्र,आणखी २२ हजार ३२६ शेतकऱ्यांना २ कोटी ८२ लाख रुपयांचा निधी अभावी लाभ प्रलंबित आहे.सन २०२५-२६ करीता अंदाजे ४ कोटी ८० लाखांचा निधी आवश्यक असल्याचे प्रशासनाने कळविले आहे.

जिल्ह्यातील सहकारी विकास संस्थांच्या संगणकीकरणाला गती मिळाली आहे.एकूण ४६९ विकास संस्थांपैकी १५६ संस्थांची निवड झाली असून त्यातील १५३ संस्थांना संगणक प्राप्त झाले आहेत.७१ कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना श-झ-उड घोषीत करण्यास मान्यता देण्यात आली असून प्रस्ताव सहकार आयुक्तांकडे पाठविण्यात आला आहे. सध्या ७० संस्थांनी Common Service Center (CSC) मार्फत ऑनलाइन सेवा देण्यास सुरुवात केली आहे.

या उपक्रमांमुळे जिल्ह्यातील शेतकरी व सहकार क्षेत्र अधिक बळकट होऊन शेतकऱ्यांना सुलभ,पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित सेवा मिळणार आहेत.

## जिल्ह्यात कृषी योजनांचा वेगवान विस्तार

धाराशिव (जिमाका)- जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असून सन २०२४ -२५ अंतर्गत शेतकऱ्यांना मोठा लाभ मिळत आहे.योजनेत २७४ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. नव्या सिंचन विहीरीसाठी ९० कामांपैकी ४८ कामे पूर्ण झाली आहे. तर उर्वरित कामे सुरू आहेत. महाडीबीटी पोर्टलवरून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन होत असल्याने पारदर्शकता वाढली आहे.या उपक्रमामुळे जिल्ह्यात १०० हेक्टर क्षेत्राला हंगामी सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली असून शेतकरी शाश्वत उत्पन्नाकडे वाटचाल करत आहेत.

शासनाने या योजनांतर्गत अनुदान मर्यादा दुप्पट केली असून शेतकऱ्यांचा प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. याशिवाय जि.प. सेस योजना २०२४ -२५ अंतर्गत चाफकटर,५ एचपी पानबुडी, पीव्हीसी पाईप, टोकन यंत्र,फवारणी पंप,ब्रशकटर, सोलार इन्सेक्ट ट्रॅप आणि स्लरी फिल्टर यांसारखी साधने शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहेत. त्याचबरोबर बायोगॅस व नविन राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत ११४ बायोगॅस संयंत्र उभारण्यात आली असून ती कार्यान्वित आहेत.यामुळे जळाऊ लाकडाचा वापर घटला,वृक्षतोडीवर नियंत्रण आले तसेच घरगुती एलपीजी खर्चात बचत झाली आहे. बायोगॅस स्लरीचा उपयोग करून शेतकरी सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला पिके घेत आहेत.

दरम्यान,खरीप हंगाम २०२५ साठी कृषी आयुक्तालयामार्फत ८५ हजार ८४५ मेट्रिक टन खताचे आवंटन झाले असून त्यापैकी ६२५७ मेट्रिक टन अनुदानित खताचा पुरवठा धाराशिव जिल्ह्यात झाला आहे.आतापर्यंत ३२७९ मेट्रिक टन खताची विक्री झाली असून मार्चअखेर जिल्ह्यात ३४ हजार ५९८ मेट्रिक टन खताचा साठा शिल्लक होता.सध्या एकूण ३६ हजार ५७६ मेट्रिक टन खत उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी पुरेसा साठा उपलब्ध राहणार आहे.

## जिल्ह्यात मनरेगाअंतर्गत रोजगार निर्मितीत लक्षणीय प्रगती

धाराशिव (जिमाका) - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) जिल्ह्यात २०२५-२६ या आर्थिक वर्षात रोजगार निर्मितीत लक्षणीय प्रगती झाली आहे.जिल्ह्यात एकूण ३ लक्ष ७१ हजार ४६२ कुटुंबे जॉबकार्डधारक आहेत.त्यापैकी केवळ चालू आर्थिक वर्षात (जुलै २०२५ पर्यंत) ४३ हजार १०६ नवीन कुटुंबांना जॉबकार्ड वाटप करण्यात आले आहे.

मनरेगा अंतर्गत जिल्ह्यास २६.९१ लक्ष मनुष्यदिवस निर्मितीचे उद्दिष्ट देण्यात आले होते.त्यानुसार जुलैअखेरपर्यंत ११.४४ लक्ष मनुष्यदिवस निर्मिती,म्हणजेच उद्दिष्टाच्या ४३.५७ टक्के कामगिरी साध्य झाली आहे.ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीच्या दृष्टीने हा टप्पा महत्त्वाचा मानला जात आहे.

योजनेअंतर्गत जुलै २०२५ पर्यंत ५२,२४८ कुटुंबांनी कामाची मागणी केली होती.त्यापैकी ५१ हजार ८२१ कुटुंबांना त्वरित रोजगार उपलब्ध करून देण्यात आला.प्रत्यक्षात ३९ हजार ६०५ कुटुंबांनी मनरेगात काम केले,तर ९४९ कुटुंबांनी १०० दिवसांहून अधिक काळ मनरेगाच्या कामांत सहभाग नोंदवला.यामुळे योजना ग्रामीण कुटुंबांच्या आर्थिक पाठबळासाठी महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे स्पष्ट होत आहे. कामांच्या अंमलबजावणीबाबत बोलायचे झाले तर,सध्या जिल्ह्यात २३ हजार १८२ कामे प्रगतीपथावर आहेत.यामध्ये जलसंधारण,शेती सुधारणा,रस्ते व इतर पायाभूत सुविधांच्या उभारणीसह विविध विकासकामांचा समावेश आहे.

दरम्यान,योजनेवर झालेल्या खर्चाच्या आकडेवारीनुसार,जुलै २०२५ पर्यंत एकूण ७६.०९ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.त्यापैकी ३८.९९ कोटी रुपये अकुशल कामांवर,तर ३६.६३ कोटी रुपये कुशल कामांवर खर्च झाले आहेत. यावरून ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा निर्माण करतानाच स्थानिकांना रोजगाराची हमी मिळत आहे.

मनरेगा योजनेमुळे ग्रामीण भागातील हजारो कुटुंबांना रोजगार उपलब्ध झाला असून,विशेषतः हंगामी बेरोजगारीच्या काळात ही योजना दिलासा देणारी ठरत आहे. जिल्ह्यातील प्रशासनाने रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी अधिक वेगाने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने मनरेगाची ही कामगिरी जिल्ह्याच्या प्रगतीला बळकटी देणारी ठरत असून,आगामी काळात ही योजना अधिक व्यापक प्रमाणात रोजगार निर्मितीची संधी निर्माण करेल अशी अपेक्षा आहे.

## धाराशिव शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आरोग्यसेवांचा नवा अध्याय

धाराशिव (जिमाका)- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव येथे मागील काही महिन्यांत आरोग्यसेवेत मोठी प्रगती झाली आहे.प्रभारी अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान यांनी दिलेल्या माहितीनुसार,अवयवदान जनजागृती अभियान राबविण्यात आले असून, विशेष म्हणजे,एका संस्थेच्या पुढाकारातून एकाच महिन्यात दोन देहदान झाले आहेत.

या रुग्णालयात जटिल शस्त्रक्रियांचा यशस्वी प्रयोग करण्यात आला आहे. मणक्याची शस्त्रक्रिया,जबड्याची शस्त्रक्रिया,आर्थोस्कोपी,प्रोस्टेट तसेच लॅप्रोस्कोपद्वारे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया पार पाडण्यात आल्या आहेत.रुग्णसेवेत सुधारणा म्हणून शस्त्रगृहांची संख्या ४ वरून ८ आणि आयसीयुतील बेड संख्या ५ वरून १२ करण्यात आली आहे.

डिजिटल इंडिया मिशनअंतर्गत रुग्णालयात Next Gen HMIS प्रणाली सुरू करण्यात आली असून रुग्णांच्या नोंदी आता आधार क्रमांक किंवा मोबाईल नंबरवर उपलब्ध होणार आहेत.तसेच,रुग्णसेवेसाठी अत्यावश्यक असलेले चठख मशीन पुढील आठवड्यात कार्यान्वित होणार आहे.

शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीनेही महाविद्यालयाला यश मिळाले आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तर्फे ऊीळींळलरश्र उरीश णपळीं ऋशश्रश्रेुीहळ साठी परवानगी मिळाली असून,डीएनबी नवी दिल्ली संस्थेमार्फत शल्यचिकित्सा व स्त्रीरोग विभागात दोन जागांना मान्यता मिळाली आहे.या अभ्यासक्रमांत पदव्युत्तर विद्यार्थी रुजू झाले आहेत.

रुग्णालयातील सेवेमुळे मृत्यूदर व संदर्भित रुग्णांच्या संख्येत तब्बल २५ टक्क्यांची घट झाली आहे.या कामगिरीमुळे जिल्ह्यातील रुग्णांना उच्च दर्जाच्या आरोग्यसेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होत आहेत.

## वागदरी येथून मराठा आरक्षण आंदोलनास बहुसंख्येने कार्यकर्ते मुंबईला जाणार

वागदरी (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वा खाली दि २९ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई येथे आयोजित मराठा आरक्षण आंदोलनास वागदरी ता.तुळजापूर येथून बहुसंखेने कार्यकर्ते जाणार असल्याचे बैठकित ठरले.

वागदरी येते मराठा आरक्षण आंदोलनाचे वागदरी समन्वयक व्यंकट पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत येथील महादेव मंदीराचा सभागृहात मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण द्यावे या मागणी करिता मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या नेत्रत्वाखाली मुंबई येथील अजाद मैदानावर दि.२९ आंगस्ट रोजी आयोजित आंदोलनात सहभागी होण्यासाठी पूर्व तयारी करण्याकरिता वागदरी येथे एक बैठक सपन्न झाली. या बैठकीत येथून बहूसंखेने कार्यकर्ते जाणार असल्याचे ठरले.

## धाराशिव खिरणी मळा परिसरातील नागरिकांची मागणी : बंद पडलेल्या शाळा इमारतीत आरोग्य केंद्र, अंगणवाडी व अभ्यासिका सुरु करावे

धाराशिव (प्रतिनिधी)-- धाराशिव शहरातील खिरणी मळा परिसरात २०१६ पासून बंद असलेली नगर परिषद शाळा क्र. ५ ची इमारत आज गंज व घाणीचे साम्राज्य बनली आहे. स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन या इमारतीमध्ये आरोग्य केंद्र, अंगणवाडी/शाळा किंवा विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका (वाचनालय) सुरु करण्याची मागणी केली आहे.

सदर शाळा बंद झाल्यामुळे परिसरात अस्वच्छता वाढली असून, काही व्यसनी लोक येथे बसून दारू, सिगारेट, गांजा सेवन करीत असल्यामुळे वातावरण दूषित झाले आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, हीच इमारत आरोग्य केंद्र, दवाखाना, अंगणवाडी किंवा विद्यार्थ्यांसाठी वाचनालय म्हणून वापरल्यास परिसर सुशोभित होईल किंवा नागरिकांना आरोग्य सुविधा मिळतील तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा देखील मिळतील. या निवेदनावर आयाज शेख, मुसव्वीर मोमीन, अफोरज पठाण, रनविर इंगळे, रिजवान पठाण, शेखर घोडके, सरताज कुरेशी, आदिल कुरेशी, शेख असिम, अरबाज पठाण, शेख हुजेफा, तांबोळी आबुहुरेर, आमेर काझी, सय्यद अरबाज यांच्यासह अनेक नागरिकांनी सह्या करून आपला पाठिंबा दर्शविला आहे. नागरिकांच्या या मागणीवर जिल्हा प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे परिसरातील लोकांचे लक्ष लागले आहे.

**NAME OF CHANGE DECLARATION**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHAIKH REHANA AKHEEL.
TO: REHANA BEGAM AKHIL AHEMAD SHAIKH
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the REHANA BEGAM AKHIL AHEMAD SHAIKH will used by my family husband / wife, children and relative.
**OLD NAME** :- SHAIKH REHANA AKHEEL.
**NEW NAME** :- REHANA BEGAM AKHIL AHEMAD SHAIKH
**Address -** OSMANABAD-413501.
**Adhar no.**-949327750577
**Mob. No.**-8484939466

## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649